
# डॉ. आर्या आशुतोष जोशी



# सकलमति प्रकाशु

# सकलमति प्रकाशु

## डॉ. आर्या आशुतोष जोशी

### ई साहित्य प्रतिष्ठान

# सकलमति प्रकाशु

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला
पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.
दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सकलमति प्रकाशु

डॉ. आर्या आशुतोष जोशी
९४२२०५९७९५

jaaryaa@gmail.com

चित्रे- श्री संकेत लिमये

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : ३ मे २०२२ (अक्षय्यतृतिया शके १९४४)**

©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

परिचय



अक्षरओळख झाल्यापासून हातात पुस्तक घेऊन पुस्तक वाचणारी अशी माझी ओळख करुन देता येऊ शकेल. शालेय आणि महाविद्यालयीन वयात खूप पुस्तकं वाचली आणि तरीही अजूनही जन्मजन्मांतरीची साहित्यिक भूक भागलीच नाही असं मला स्वतःला वाटतं. ना.धों.महानोर, शांताबाई शेळके यांच्या कवितांची विशेष आवड आणि गो.नी.दां आणि पु.ल.देशपांडे हे प्रिय लेखक! कविता,प्रवासवर्णनं,इतिहास हे विशेष आवडीचे वाचनाचे विषय.

कुठेही भटकायला गेलं की सभोवार पाहताना एखादी कविता सुचते, भटकून घरी परतल्यानंतर अचानक सुरसुरी येते आणि मनातला अनुभव कागदावर उमटू लागतो. मला व्यक्त व्हायला मनापासून आवडतं आणि त्यासाठीची माध्यमं म्हणजे गाणं,नाचणं आणि लिहीणं.

हे मी माझ्या आनंदासाठी करत असतानाच मैत्रिणींनी ते वाचलं आणि आम्हालाही वाचायला आवडेल असं म्हणून ते कुठेतरी प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिलं.त्यातून मग ब्लॉग सुरू केला.

मी व्यवसायाने संशोधक! संस्कृत भाषा, भारतीय संस्कृती, हिंदू धर्मशास्त्र, भारतीय तत्वज्ञान हे माझे संशोधनाचे विषय! त्यातूनच मग व्याख्याने देणे, विविध माध्यमांवर लेख लिहिणे हे सुरू झालं. मराठी विकीपिडियावर संपादिका म्हणून काम करताना मला माझ्या वाचनाचा खूप उपयोग होतो.

छायाचित्रण करायला आवडतं त्यामुळे माझ्या कवितांना बरेचदा माझीच छायाचित्र सोबत करतात.

कोकणातल्या आमच्या घरी वावरताना निसर्गाच्या सान्निध्यात मनालाही नवी पालवी फुटते आणि कवितांचा जन्म होतो.

एकूण काय आयुष्याचा आनंद घेणं आणि विविध माध्यमातून विशेषतः लेखनातून अभिव्यक्त होणं मला आवडतं,माणूस म्हणून समृद्ध करत जातं.!

पुस्तक वाचायला आवडतं तसंच मला माणसं वाचायलाही आवडतं!

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं वाचल्यानंतर लेखकांना संपर्क करून अभिप्राय देणं हे ही आवडतं ते त्यामुळेच! समविचारी लोकांना भेटणं आणि त्यांच्यासह वैचारिक आनंदाची देवाणघेवाण हे पण माझं एक आवडतं काम आहे!

सारांश मी ही तुमच्यासारखीच,तुमच्यातलीच एक आहे! आपला हा साहित्यबंध दृढ होत जावाअशी अपेक्षा करते.

डॉ. आर्या आशुतोष जोशी

# प्रस्तावना

गजानन ही बुद्धीची देवता, सकल कलांचा अधिपती ! लहान थोरांचा लाडका गणपतीबाप्पा! त्याचे रूप सर्वांना मोहवून टाकते.

गणेशाच्या रुपामागील तत्वज्ञान विशद करणारे अथर्वशीर्ष हे ही सर्वदूर लोकप्रिय आहे. गणेश ही देवता केवळ भारतातच नाही तर भारताच्या बाहेरही विविध देशांमध्ये आदराचे स्थान मिळवून आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रात धुमधडाक्यात साजरा केला जातो. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने केवळ गणेशाची स्थापना करणे, त्याची पूजा आरती करणे यापलीकडे जाऊन ज्या गणपतीची आराधना आपण करतो त्याच्या विषयी अधिक काही माहिती जिज्ञासूंनी वाचावी या हेतूने लिहिलेली ही लेखमाला.

गणेशाचे स्वरूप, त्याचा इतिहास, साहित्यातील त्याचे वर्णन , त्याचे आध्यत्मिक स्वरूप हा विषय खूप मोठा आहे. गाणपत्य संप्रदायाची विविध व्रते, विधी- विधाने समजून घेणे हा सुद्धा एक रंजक भाग आहे. तथापि **सर्वसामान्य वाचकाला प्रारंभी सोपे सुटसुटीत काही हाती द्यावे आणि त्यातून त्याला अधिक खोलात जाऊन अभ्यास करण्याचे प्रेरणा मिळावी असा हेतू या लेखनामागे आहे.**


पुण्यातील सकाळ या दैनिकाने या लेखमालेसाठी विचारणा केली आणि दहा दिवस २०२१ सालच्या गणेशोत्सवात रोज एक लेखांक त्यांनी प्रसिद्ध केला. ही लेखमाला अधिक वाचकांना उपलब्ध व्हावी म्हणून हे साहित्य प्रकाशित करण्याची परवनागी देखील मोठ्या मनाने दिली आहे. त्यांची मी आभारी आहे. श्री. आशिष तागडे सर यांच्याप्रती देखील मी कृतज्ञता व्यक्त करते.

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी संस्था ही बहुतेकांना परिचित असतेच. ज्ञान प्रबोधिनीतील संस्कृत संस्कृती संशोधिका हे माझे कार्यालय नसून ते तर माझे दुसरे घरच आहे. माझे सर्व संशोधन मी येथूनच करते. या लेखमालेसाठीचा सर्व अभ्यासही अर्थातच इथूनच मी केलेला आहे. त्यामुळे माझे विभागप्रमुख श्री. विश्वनाथ गुर्जर आणि माझे सर्व सहकारी यांची ऋणी आहे, ज्यांच्या पाठिंब्याने मी अभ्यास करू शकते आणि तो प्रकाशित करू शकते.

ही पुस्तिका म्हणजे दोन प्रकारच्या अभिव्यक्तींचा समन्वय आहे. गणपती ही जशी ज्ञानाची देवता तशीच ती कलेचीही देवता. श्री. संकेत लिमये हे माझे स्नेही. ते बहुभाषा अभ्यासक आहेत आणि सुलेखनकारही आहेत. माझ्या लेखणीला त्यांच्या कुंचल्याची जोड मिळावी हीसुद्धा गणेशाचीच कृपा आहे.

सर्वात शेवटी अर्थातच ई साहित्य प्रतिष्ठानचे विशेष आभार! माझा हा छोटा लेखन प्रपंच सर्वदूर पोहोचविण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे.

डॉ. आर्या आशुतोष जोशी


गं गणपतये नमः
संकष्ट
संकल्पना आणि सुलेखन :
संकेत लिमये
चतुर्थी

## लेखांक १

# देवा तुचि गणेशु।

ओम् गणानां त्वा गणपतिं हवामहे,

कविं कवीनाम् उपमश्रवस्तमम् ।

ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते,

आ नः श्रृण्वन् ऊतिभिः सीद सादनम् ।। ऋग्वेद २.२३.१

हा मंत्र सर्वांच्या परिचयाचा आहे. ऋग्वेदातील या मंत्रामधे आपल्याला गणपती असा शब्द दिसून येतो.

ओम् ब्रह्मणस्पते त्वमस्य यन्ता

सूक्तस्य बोधि तनयं च जिन्व।

विश्वं तद् भद्रं यदवन्ति देवाः

बृहद् वदेम विदथे सुवीराः।। ऋग्वेद २.२३.१९

या मंत्रामधे आपल्याला ब्रह्मणस्पती या देवतेचा उल्लेख आढळतो.

वैदिक साहित्यात गणपती हा शब्द गणांचा अधिपती अशा अर्थाने आलेला दिसतो.

लंबोदर, एकदंत, शूर्पकर्ण, गजमुख रूपातील जो गणपती आपल्यासमोर उभा राहतो तो हा गणपती नव्हे. हत्तीचे मुख, मोठे पोट, सुपासारखे कान या रूपातील गणेश वैदिक साहित्यात आढळत नाही.

ब्रह्मन म्हणजे वाणी. ऋग्वेदामधे वाणीचा अधिपती असलेल्या ब्रह्मणस्पतीला गणपती असेही म्हटले गेले आहे.तो मंत्रविद् म्हणजे मंत्र जाणणारा देव हा सर्व जगाचा नियामक मानला गेला आहे.तो देव इ.गणांचा म्हणजे समूहांचाही अधिपती आहे.त्यांचा नायक आहे.सर्व ज्ञानी लोकांमधेही तो सर्वश्रेष्ठ आहे.

देवताविकासाच्या क्रमामधे ब्रह्मणस्पती या देवतेचा ज्ञानाशी असलेला संबंध, गणांचा अधिपती म्हणून संघटनेच्या नायकरूपाशी असलेला संबंध आजच्या प्रचलित गणेशरूपाशी जोडला गेला असावा असे विविध अभ्यासक नोंदविताना दिसतात.

गणपती हा विद्येची, ज्ञानाची श्रेष्ठ देवता मानला गेला तो ही याच कारणामुळे. विद्यारंभी ज्ञानदात्या गजाननाचे आदरपूर्वक स्मरण केले जाते.

शिव, विष्णु, गणेश, देवी या देवतांना उपास्य दैवत मानणारे विविध संप्रदाय कालक्रमात उदयाला आले.शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त या नावाने ते ओळखले जातात.

शैव संप्रदायाच्या धारणेनुसार शिव म्हणजे शंकर या देवतेचे जे गण म्हणजे समूह किंवा समुदाय त्यांचा अधिपती किंवा प्रमुख म्हणूनही गणपतीला विशेष मान दिलेला आहे. शिव आणि पार्वतीचा पुत्र म्हणूनही पुढे गणपती शिव परिवारात सामील झालेला दिसून येतो.

अशाप्रकारे विद्येची, ज्ञानाची आणि अर्थात संघटनेची देवता असलेला हा गणपती. संघटनेचा नायक म्हणून तो कुशल नेताही आहे. त्याचा सेनानायक किंवा गणांचा नायक हा गुण विशेष आत्मसात करण्यासारखा वाटतो.

भारतातील नवयुवक आणि युवतींनी गणेशाचा हा गुण अंगिकारत देशाच्या कल्याणासाठी स्वत:मधील नेतृत्वशक्ती जागी करण्याचा संकल्प या गणेशोत्सवाच्या निमित्ताने जरूर करावा.


तमिळनाडूतील
विनायक
विनायक
संकल्पना आणि सुलेखन :
संकेत लिमये

## लेखांक २

# प्रथम तुला वंदितो...

तू सुखकर्ता तू दुःखहर्ता अशा शब्दात गणपतीचे स्तवन नेहमीच केले जाते. गणपतीचा विघ्ननाशनाचा हा गुण त्याच्यामधे कसा आला हे समजून घेणे काहीसे रंजकही आहे.

विद्यारम्भे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा।
संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते।।

कोणत्याही शुभप्रसंगी गणेशाचे स्मरण केले की तो विघ्ने दूर करतो अशा आशयाचा हा श्लोक आहे.

एखाद्या देवतेच्या रूपाचा विकास होत असताना त्यात वेगवेगळी स्थित्यंतरे येत असतात.असाच हा एक बदल या लेखात जाणून घेऊयात.

गणपतीचे बाह्य रूप जसे बदलत गेले तसाच त्याच्या तात्विक रूपातही बदल होत गेला असं आपल्याला दिसून येतं.

विनायक हे गणपतीचं एक प्रसिद्ध नाव. शान्तिमयूख ग्रंथात विनायक नावाच्या सहा गणांचा उल्लेख येतो.मित, संमित, कटंकट, कूष्मांड, राजपुत्र आणि शाल हे ते सहा गण होत.हे विनायक गण लोकांच्या कामात बाधा आणत, त्यांचा लोकांना त्रास होत असे. वराह पुराणातील आख्यायिका आहे की ऋषींच्या यज्ञकार्यात नेहमी बाधा येत असे.ती दूर करण्यासाठी ते शंकराकडे गेले आणि त्यांनी त्याची प्रार्थना केली.शंकराने स्वतःच्या सामर्थ्याने शस्त्रधारी, निळया रंगाचे, हत्तीचे तोंड असलेल्या अशा विनायक गणांची निर्मिती केली.स्वतःच्या मुखापासून तयार केलेल्या कुमाराला त्याने या गणांचा मुख्य म्हणून नेमले आणि त्याला वर दिला की तुला गणेश, विनायक अशी नावे लाभतील.तेव्हापासून उपद्रवी असे विनायक हे गणेशाच्या आधीन राहू लागले.शंकराने दिलेल्या वरामुळे विनायकांचा अधिपती असलेल्या गणेशाचे कार्यारंभी विघ्नहर्ता म्हणून स्मरण, पूजन होऊ लागले.

गाणपत्य संप्रदायात तसेच अन्य पुराणातही अशा विविध आख्यायिका आढळून येतात.

पण यातून घेण्याचा बोध असा की वाईट कामे करणाऱ्या व्यक्ती,  सद्वर्तनी सत्शील नेतृत्वाच्या आधिपत्याखाली असल्या तर त्यांचे परिवर्तन होणे कठीण नाही.मात्र त्यासाठी नेत्यामधे कुशलता आणि सदाचार असणे आवश्यक आहे. आपणही समाजामधे विविध प्रकारचे संघटन करताना दुष्ट प्रवृत्तीवर मात करून त्या विधायक कशा होतील, त्यातून सर्वांचे कल्याण कसे साधता येईल याचा विचार या गुणवैशिष्ट्यातून जरूर करावा.


संकल्पना आणि सुलेखन

# लेखांक ३

# गणराज रंगी नाचतो

कला आणि विद्यांचा अधिष्ठाता असलेला गणेश एक उत्तम नर्तकही आहे बरं का ! आपलं लंबोदर आणि तुंदिलतनु रूप सांभाळूनही तो स्वतःच्या नृत्यकलेतील प्राविण्य जोपासतो आहे.

नटराज शिवाचा पुत्र अशी त्याची पुराणग्रंथातली ओळख आहेच.त्यामुळे कधी तो आपल्या पित्याच्या नृत्यात त्यांना वाद्याची साथ करताना दिसतो तर कधी स्वतः नृत्यात मग्न होतो.कर्नाटकातील बदामीच्या प्रसिद्ध लेण्यांमधे नृत्यात मग्न शिव आणि त्याच्यापुढे वाद्य हाती घेतलेला गणपती आपल्याला दर्शन देतात.

ब्रह्म पुराणातील आख्यायिकेनुसार गणेशाने शंकर आणि पार्वती यांच्यासमोर नृत्य करून त्यांना प्रसन्न केले आणि त्यामुळेच शंकरांनी त्याला कौतुकाने स्वतःच्या डोक्यावरील चंद्र बहाल केला.

शिल्पशास्त्रातही नृत्यगणेशाची विविध रूपं आपल्याला अनुभवायला मिळतात. नृत्य करताना कधी तो आपल्या हातात सर्पही धरतो.

भारतातील प्राचीन मंदिरांवर कोरलेल्या वैविध्यपूर्ण मूर्तींमधे नृत्य गणेशही पहायला मिळतो. चिन्नकेशव मंदिराचे प्राचीन स्थापत्य असो वा फिलाडेल्फिया संग्रहालयातील नृत्यगणेशाची मूर्ती. या मूर्ती देवतेचा पदन्यास दाखवतात.

समर्थ रामदासांनी दासबोधामधे नृत्यगणेशाचे सुरेख वर्णन केलेले आहे.पहिल्या दशकाच्या दुसऱ्या समासात समर्थ म्हणतात..

सगुण रूपाची टेव । माहा लावण्य लाघव ।
नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती ॥ ८॥
चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी ।
लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा ॥ १३॥
नट नाट्य कळा कुंसरी । नाना छंदें नृत्य करी ।
टाळ मृदांग भरोवरी । उपांग हुंकारे ॥ २१॥
स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशईं अग्रगण ।
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ॥ २२॥
रुणझुणा वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें ।
घागरियासहित मनोहरें । पाउलें दोनी ॥ २३॥
ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा ।
साहित्यविशईं सुल्लभा । अष्टनायका होती ॥ २४॥
ऐसा सर्वांगे सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु ।
त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें ॥ २५॥

अत्यंत नटून सजून , चपळाईने तरीही लालित्यपूर्ण नृत्य करणारा गणेश हा सर्व कलाकारांचा आदर्शच आहे.

सर्वांना आपल्या कौशल्याने मोहित करून कलेची निष्ठेने आराधना करण्याचा गुण शिकविणारा हा नृत्यगणेश सर्व कलासक्त मनांना प्रेरणा देत राहो.



## लेखांक ४

# त्वं ज्ञानमयः विज्ञानमयः।

पाशांकुशवरद हस्त। एके करी मोदक शोभत।
मूषकावरि अति प्रीत। सर्वांगी सिंदूर चर्चिला॥
असे गणपतीचे मोहक रूप.

गणपतीचा मोठा आकार पाहता तो एका चिमुकल्या उंदरावर स्वार होतो ही कल्पना आश्चर्यकारक वाटते.पण तरीही बालगोपाळांना गणपतीसह असलेल्या या उंदीरमामाचे विशेष आकर्षण असते.

गणेश पुराणात एक आख्यायिका आहे.ही बालगोपाळांना नक्की आवडेल.

एक गंधर्व होता.त्याचं नाव क्रौंच.इंद्रदेवाच्या सभेत एकदा तो फिरत असताना चुकून त्याचा पाय वामदेवाला लागला.वामदेव लगेच रागावून त्याला म्हणाले की "तू उंदीर होशील."

उंदीर झालेला तो गंधर्व पराशर ऋषींच्या आश्रमात आला आणि तिथले सगळे पदार्थ खायला त्याने सुरूवात केली.हे पाहून पराशर ऋषी गोंधळले.

या संकटातून सोडविण्यासाठी नंतर पराशरांनी गणेशाची प्रार्थना केली. गणेश प्रकटला आणि त्याने उंदराला वर मागण्यास सांगितले. पण उन्मत्त उंदराने गणपतीलाच सांगितलं की तूच मला वर मग.हे ऐकून गणपती रागावला आणि आजपासून तू माझे वाहन हो असा आदेश त्याने उंदराला दिला.

उंदीर हा गणपतीचे वाहन कसे बनला असावा याची या प्रातिनिधीक आख्यायिकेच्या आधारे कल्पना येते.

गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी उंदीरमामाला खिरीचा नैवेद्य दाखविण्याची पद्धतीही लोकसंस्कृतीत रूढ असलेली दिसून येते.

चंचल, सतत इकडून तिकडे धावणारा असा हा मूषक अज्ञानाचे प्रतीक. ज्ञानाची, विद्येची देवता असलेला गणपती त्यावर आरूढ होतो. ज्ञानाने अज्ञानावर मिळविलेला विजय हे गणपतीचे गुणवैशिष्ट्य या रूपकातून दिसून येईल. ज्ञानाची उपासना करायची असेल तर भौतिक वस्तूंचा मोह टाळत, एकाग्र चित्ताने, स्वस्थपणाने, एका जागी बसून अभ्यास करणे, मनाची धावपळ कमी करणे, चिंतन करणे फार महत्वाचे आहे हे या रूपकातून शिकण्यासारखे आहे.


संकल्पना आणि सुलेखन :
संकेत लिमये
महाकाय सुर्यकोटी समप्रभ,,,

# लेखांक ५

# त्वं गुणत्रयातीतः।

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला आपण ज्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करतो तो गजमुख म्हणजे हत्तीचे मुख आणि माणसाचे शरीर असलेला हा देव.तो चार हातांचा, सुपासारखे कान असलेला, एकच दात असलेला गणपती आपल्याला पूजनीय, वंदनीय ठरला आहे.

गणेशाच्या विविध मूर्ती आपल्याला भारतात आणि भारताबाहेर अन्य संस्कृतींमधेही पहायला मिळतात.

या मूर्तींच्या हातांमधे आपल्याला विविध गोष्टी दिसतात.

गणेशाच्या हातामधे परशु आहे. पराक्रमाचे, वीरतेचे ते प्रतीक आहे.वीरतेसाठी सुदृढ शरीर, उत्तम बाहुबल, स्थिर मन बुद्धी या सर्वांचीच आवश्यकता असते.

गणेशाच्या हाती पाशही आहे. पाश म्हणजे नियंत्रण. दुष्टांच्या कृत्यांवर पाश टाकून त्यांना बंधनात ठेवणारा गणपती.त्याच्या हातातील पाश हा स्वतःवरील नियंत्रणाचेही द्योतक आहे.

गणेशाच्या हाती असलेला अंकुश हा सुद्धा उन्मत्त हत्तीला आवरण्यासाठीच वापरला जातो.तो स्वतः गजमुख आहेच आणि त्याच्याच हाती अंकुश आहे.वाईट प्रवृत्तींना काबूत ठेऊन त्यांना योग्य मार्गावर आणण्यासाठी अंकुशाची आवश्यकता भासतेच.स्वतःच्या मनाच्या चंचलपणाला, विचारांच्या अनावश्यक गतीला ताब्यात ठेवण्यासाठी आपल्यालाही अंकुश हाती घ्यावाच लागतो.

गणपतीला मोदक आवडतो.मोद म्हणजे आनंद.सोंडेमधे मोदक धरलेला बाप्पा बालगोपाळांनाही प्रिय आहे.प्राणप्रतिष्ठित गणपतीच्या हातावर घरातला छोटेखानी मोदक ठेवण्याचं धारिष्ट्य दाखवण्यात लहान मुलांना विलक्षण आनंद मिळतो. आयुष्यातील भौतिक सुखांचा आनंदही तितकाच महत्वाचा असतो हे तर मोदकप्रियतेतून बाप्पा सुचवत नसावा!

पण याच जोडीने मानवी जीवनाचे पूर्णत्व सामावलेले आहे आध्यात्मिक उन्नतीमधे.मन आणि बुद्धीला स्थैर्य आणण्यासाठी आध्यात्मिक साधनेची

जोडही तितकीच महत्वाची ठरते.त्यामुळेच की काय गणपतीच्या हाती रूद्राक्षमाला/अक्षमाला आहे.

गणपतीच्या विविध रूपांमागे अशा विविध रंजक संकल्पना दडलेल्या आहेत. त्यामागील रूपक उलगडण्याचा प्रयत्न या गणेशोत्सवात करूयात.

गणपती हा सत्व, रज आणि तम या तीन गुणांच्याही पलीकडचा असा आहे असं अथर्वशीर्षात म्हटलं आहे.हे त्याचं आध्यात्मिक रूप.

तरीही गणपतीच्या बाह्य रूपात दडलेल्या गुणवैशिष्ट्यांपैकी अनेक गुणांचा अवलंब करीत शरीर मन बुद्धी यांचा समतोल राखून आपले व्यक्तिमत्व उन्नत करण्याचा संकल्प करूया.


अक्षर गणेश
श्री
बाप्पा
संकल्पना आणि सुलेखन - संकेत लिमये

## लेखांक ६

# त्वं आनंदमयः।

मागील लेखांकात मानवी आयुष्यातील भौतिक सुखाचा आनंद आणि आध्यात्मिक उन्नती यांचं महत्व सारांशाने लक्षात घेतल्यावर या लेखांकात गणेशाच्या गुणवैशिष्ट्यांच्या जोडीने "चतुर्थी" तिथीचे महत्वही समजावून घेऊ.

चतुर्थी ही चौथी तिथी आहे. प्रतिपदा, द्वितीया, तृतीया या तीन तिथींच्या नंतर येणारी ही तिथी.गणपतीला चतुर्थी तिथी प्रिय आहे अशी धारणा आहे.

गणपती या देवतेच्या उपासनेसाठी केले जाणारे उपवासही चतुर्थीलाच केले जातात.

जागृती म्हणजे जागेपणीचा काळ.अविरत कार्य करीत राहण्याचा काळ.

दिवसभराच्या शारिरिक श्रमानंतर शरीराला विश्रांती देण्यासाठी पुरेशी झोप महत्वाची असते.स्वप्नावस्था म्हणजे झोपेमधे आपल्याला जी स्वप्ने पडतात तो काळ.काही स्वप्ने आपल्याला सकाळी उठल्यानंतरही आढळतात.काही स्वप्नांची मालिकाच आपण झोपलेल्या अवस्थेतही अनुभवतो.

सुषुप्ती म्हणजे यापलीकडची अवस्था.गाढ झोपेचा काळ. या अवस्थेचा अनुभव हा स्वप्नावस्थेच्या पलीकडचा असतो.

याच्या पुढची अवस्था म्हणजे तुरीयावस्था.मनाची उन्मनी अवस्था.

तुरीयावस्था ही आध्यात्मिक उन्नतीसाठी महत्वाची मानली जाते. ही चौथी म्हणजे चतुर्थ अवस्था.

गणेशाच्या उपासना परंपरेत या चतुर्थ अवस्थेला महत्व दिले गेले असल्याने आपोआपच चतुर्थी या तिथीलाही गणपतीच्या व्रतांमधे महत्वाचे स्थान दिले गेलेले दिसते.


विविध धर्म- संप्रदायांच्या उपासना पद्धतींमधे आध्यात्मिक साधनेला विशेष महत्व आहे.ध्यानावस्था साधण्यासाठी शरीर मन बुद्धीचे समत्व आवश्यक असते.

चंचल मनाला आवर घालून, सर्व विचारांच्या पलीकडे जात, केवळ आपल्या उपास्य दैवताचे चिंतन करणे, त्याच्या स्वरूपाची आठवण करणे, गुरुंच्या मार्गदर्शनाचे विचार साठवत स्वतःच्या आत्मिक उन्नतीचा प्रयत्न तुरीयावस्थेमधे साध्य करायचा असतो.

सत्- चित् -आनंदस्वरूप परमात्म्याच्या भेटीची थोडक्यात जीवाशिवाच्या भेटीची ही अवस्था साधण्यासाठी गणपती आपल्याला चतुर्थी तिथीच्या त्याच्या प्रेमातून प्रोत्साहनच देतो आहे.

चतुर्थीचे गणेशाचे उपवास सोडताना चंद्रदर्शनाचेही महत्व असते. भारतीय तत्वज्ञान परंपरेत चंद्राचा आणि मनाचा संबंध जोडलेला दिसून येतो. पूर्णतेजाने निथळणारे पौर्णिमेचे पूर्णचंद्रबिंब आपल्या मनालाही आनंद देतेच. गाणपत्य संप्रदायाच्या उपासनेत चतुर्थी तिथीचा चंद्रही गणेशाच्या उपासनेशी जोडला गेलेला दिसून येतो.

गणेशाचे अभ्यासक मानतात की आकाशात ज्याप्रमाणे चंद्र हा चंचल असतो म्हणजे त्याच्या कला वाढतात व कमी होत जातात त्याप्रमाणे मानवी मनाचीचीही अवस्था सतत बदलत असते.त्यामुळे मनाची चंचलता कमी कमी करत गणपतीचे ध्यान करण्याचा प्रयत्न गणपतीच्या उपासकांनी अवश्य करावा.


माझी
वाट
संकल्पना आणि सुलेखन
- संकेत लिमये
बघताय ....
मग झाली का तयारी ?

## लेखांक ७

# वंदन व्रातपतिला.. वंदन प्रमथेशाला।

समाजात जसे विद्वान सदाचारी लोक असतात, समाजाचे नीतिनियम आचरणारे लोक जसे असतात तसेच समाजापासून वेगळे राहणारे, समाजाच्या चालीरीती न स्विकारणारे असेही लोक आपण अनुभवत असतो. आपल्याला दैनंदिन जीवनातही समाजात वावरताना व्यक्ती तितक्या प्रकृती ही उक्ती अनुभवाला येते.मात्र साधारणतः समाजाच्या चौकटी न पाळणाऱ्या व्यक्तींकडे समाज काहीसा अनास्थेने पाहतो.

वैदिक काळातही समाजरचनेत विविध गट अस्तित्वात होते असे विविध ग्रंथांमधील संदर्भांवरून दिसून येते.

यजुर्वेदातील रूद्रसूक्तामधे रूद्र ही देवता जशी चोरांचीही देवता मानली गेली आहे तसाच अथर्वशीर्षात गणपती हा व्रात्यांचा अधिपती मानला गेला आहे.

व्रात्य म्हणजे खोडकर असा अर्थ आपल्याला साधारणपणे माहिती असतो.

वैदिक परंपरेनुसार ज्यांचा उपनयन संस्कार झालेला नाही त्यांना व्रात्य म्हटले जात असे. यांना सावित्रीपतित म्हणजे सवितृ देवतेचा गायत्री छंदातील

जो मंत्र त्यापासून दुरावलेले असेही म्हटले जात असे. उपनयन संस्कारामधे या गायत्री मंत्राची दीक्षा महत्वाची असते. ज्यांच्यावर हा गायत्री मंत्राचा संस्कार झाला नाही असे लोक म्हणजे व्रात्य!!

हे व्रात समुदायाचे लोक त्याकाळी प्राण्यांची शिकार करुन त्यावर जगत असत.शरीराला जाणिवपूर्वक त्रास होईल अशा प्रकारची कठीण व्रते आचरीत असत. ज्ञानोपासनेची, यज्ञाची परंपरा सांभाळणाऱ्या समुदायांपेक्षा त्यांचे जीवन हे असे वेगळे असावे असे मानले जाते.(विविध अभ्यासक याविषयी आपली मते नोंदविताना दिसतात.)

गणपती अथर्वशीर्षात अशा समुहांचा अधिपती म्हणून गणेशाला "व्रातपती" असे म्हटलेले आहे.

गणेशाची सर्वसमावेशकता यातून दिसून येते.

आपल्या नेतृत्वगुणाने समाजाला दिशा देणारा गणपती व्रात्यसमूहालाही मार्गदर्शन करतो आहे.त्यांनाही गणेशाने स्विकारलेले आहे, त्यागलेले नाही हा त्याचा एक विशेष.अथर्वशीर्षात


नमो व्रातपतये, नमो गणपतये, नमःप्रमथपतये असे गणेशाला वंदन केलेले आहे. तो समुहाचा नेता आहे, तो प्रमथांचा म्हणजे शंकराच्या गणांचा नायक आहे आणि तो व्रात्यांचाही अधिपती आहे.

ज्यांची संघटना घडवून आणायची आहे अशा व्यक्तींच्या गुण-दोषांसकट त्यांना स्वीकारणे हे नेत्याचे प्रथम कर्तव्य आहे.तो त्याचा मूलभूत गुणही असावा

लागतो. आपल्या व्यक्तिमत्वातील उत्तम गुणांनी आपल्या समुहातील सदस्यांना सत्कार्याची प्रेरणा देत राहून सुसंघटित समाज घडविण्याची प्रेरणा हा व्रातपती गणपती आपल्याला देतो आहे.

देशाच्याच नव्हे तर जगाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांना तोंड देण्यासाठी आज अशा अनेक व्रातपती, गणपती, प्रमथपतींची समाजाला आवश्यकता आहे.सद्गुण, सदाचारसंपन्न उत्तम विकसित असे उत्तमोत्तम स्त्री पुरूषांचे नेतृत्व गणेशाच्या कृपेने समाजरचनेत घडावे अशी प्रार्थना!




मी
येतोय
संकल्पना आणि सुलेखन :
संकेत निमये

## लेखांक ८

# गजवदन सुरंगी रंगसाहित्यरंगी।

भारतीय धर्म -संस्कृतीतील विविध देवतांचा विकासक्रम समजून घेणे, त्यांची ऐतिहासिकता जाणून घेणे हे जितके रंजक आहे तितकेच ललित साहित्यावर प्रभाव टाकणाऱ्या या देवादिकांचे साहित्यातील स्थान समजून घेणेही आनंददायी आहे.

गणांचा अधिपती असलेला, चौदा विद्या चौसष्ट कलांचा दाता असा गणेश हा विविध संतांच्या, उपासकांच्या आणि कवींच्याही चिंतनाचा विषय ठरला नसावा तर नवल!

मनांवर अधिराज्य गाजविणाऱ्या आधुनिक युगातील चित्रपटसृष्टीलाही गजाननाने मोहून टाकले आहे याचा प्रत्यय विविध गीतांमधून अनुभवाला येतो.काही गणेशगीते ही भक्ताला त्यांच्या ठेक्यावर ताल धरायलाही लावतात.

विशेषतः महाराष्ट्रातील संतांच्या आणि कवींच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेला गणेश त्याची गुणवैशिष्ट्ये घेऊन या लेखांकात भेटेल.

नृत्यगणेशाचे समर्थ रामदासस्वामींनी केलेले वर्णन वाचून आपलं भानही हरपून गेलं असेलच.

गणेशाचं तात्विक रूप महाराष्ट्रमनात सोप्या शब्दात ठसवलं ते ज्ञानेश्वर माऊलींनी ! ओम नमोजी आद्या।वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।|देवा तुचि गणेशु। सकलमतिप्रकाशु। म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।अकार चरणयुगुल।उकार उदर विशाल।मकार महामंडल। मस्तकाकारे।।हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कळवले। ते मिया श्रीगुरुकृपा नमिले। आदिबीज।।

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या प्रारंभीच गणेशाच्या तात्विक रूपाचे वर्णन करताना माऊली म्हणतात तरी तर्कु तोच फरशु।नीतिभेदु अंकुशु।वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे।।

संत नामदेव महाराज म्हणतात,

चतुर्थ आयुधे शोभताती हाती।भक्ताला रक्षिती निरंतर।भक्तवत्सला ऐके पार्वतीनंदना।नमन चरणा करितसे।।

गणेशाचे आपल्या भक्तांवर निस्सीम प्रेम आहे.तो भक्तांवरील संकटे दूर करून त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवतो.

गाणपत्य संप्रदायाचे ज्येष्ठ उपासक मोरया गोसावी म्हणतात- अहो, येई तू मोरया, हो त्रयलोक विसावया। जडडीव तारावया हो तूचि।।

संसाराचा भवसागर पार करून जड, मूढ, भक्तांचे तारण करणारा गणेश त्रैलोक्याला स्थिरता देणारा आहे.

रामविजयग्रंथात कवी श्रीधरांनी विवेकाचा अंकुश हाती घेतलेल्या गणेशाचे गुणवर्णन केले आहे ते असे-

भक्तांचा मनोवारण अणिवार।नावरेचि कदा साचार।तो आकर्षवाया निर्धार।विवेकांकुश धरियेला।।

भक्ताच्या चंचल मनाला स्थिरता देणारा असा हा गणपती.

मध्वमुनीश्वर, कवी मोरोपंत, कवी नरेंद्र, शिवदास गोमा यांच्याही गणेशरचना समजून घेण्यासारख्या आहेत.

भक्तिरंगात रंगलेला गणेश शाहिरांच्या कवनातूनही डोकावला आहे.

शाहीर प्रभाकरांच्या कवनात गीताच्या रचनेची आज सिद्धी करण्यासाठी हे गणराया तू ये अशी विनंती केलेली दिसते.

गौरीसुता सभे लंबोदरा ये।सांदुरमर्दन विघ्नहरा ये।गीत प्रसंगी रे करी आज सिद्धी।गातो आधी तुला विघ्नहरा ये।

पूजाप्रसंगी वंदनीय गणेश कलेच्या सादरीकरणाप्रसंगीही अग्रस्थानी स्मरणीय आहे.त्याच्या आशीर्वादानेच शाहिरांची कला जनमानसात पोहोचली आहे.

गणपती ही सर्वांचेच आराध्य दैवत आहे.गणपतीचा प्रत्येक गुण प्रेरणादायी आहे. कोणत्याही कार्याला त्याचे आशीर्वाद मागण्याची परंपरा विविध माध्यधमातून दिसून येते.मग तो अभंग असावा वा शाहिरांचे कवन किंवा प्रथम तुला वंदितो यासारखे सुप्रसिद्ध चित्रपटगीत!

प्रत्येकालाच "आपलंसं" करणारा, "आपला" वाटणारा असा हा आपला लाडका बाप्पा साहित्यरंगात रंगून गेलेला आहे.



## लेखांक ९

# मंगलमूर्ती गणेश

गणांचा म्हणजे समूहांचा नायक, शिवाच्या सैन्याचा नायक म्हणून गणपती हा नेतृत्वासाठी प्रेरणा देणारा आहे.

या जगाचा निर्माताही तो आहे.तो आदितत्व आहे.

तो आपल्या भक्तांचे रक्षण करणारा आहे. तो वक्त्याचे म्हणजेच जो गणपतीचे गुणवर्णन करणाऱ्या अशा भक्ताचे रक्षण करतो.ते गुणवर्णन ऐकणाऱ्या श्रोत्यांचेही रक्षण करतो.तो सर्वांचे मंगल करणारा आणि स्वतः मंगलस्वरूप असा आहे.

भारतीय परंपरेत ज्ञानाला विशेष महत्व आहे. ज्ञाननिर्मिती करणारे गुरु आणि ते स्वीकारणारे शिष्य यांचेही तो रक्षण करणारा आहे.आपल्या भक्तांवर सर्व दिशांनी तो कृपादृष्टी ठेवणारा आहे.

पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांमधेही गणेशतत्व व्यापून आहे.

अथर्वशीर्षात गणपतीला गुणत्रयातीत म्हणजे सत्व, रज, तम या तीन गुणांच्या पलीकडचा देव मानले आहे. सात्विक, राजसिक आणि तामसी वृत्ती

आपल्या प्रत्येकामधेच असतात.पण आपली सात्विकता वाढावी यासाठी आपणही गणेशाच्या उपासनेतून विशेष प्रयत्न करावा.

गणेशाला सिद्धिविनायक म्हटले जाते. भाद्रपद शुक्ल चतुर्थीलाही महासिद्धिविनायकी चतुर्थी म्हटले जाते. विविध सिद्धी गणेश आधीन आहेत असे मानले जाते.या सिद्धी भौतिक गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठी त्याच्या आधीन नसून पारलौकिक उन्नती साधण्यासाठी या सिद्धी उपकारक ठरतात.म्हणूनच आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठीही सिद्धिविनायकाची आराधना उपयुक्त मानली जाते.

गणेशाला सुमुख म्हटले जाते कारण त्याचे मुख सुंदर आहे.त्याच्या मुखावरील ज्ञानाचे तेज सर्वांना मोहून टाकते.

गणपतीला गजमुख म्हटले जाते. हत्ती हा बुद्धीमान प्राणी मानला जातो. त्याचे डोळे बारीक आहेत. जेव्हा आपल्याला लांबचे दृश्य पहायचे असते तेव्हा आपणही डोळे बारीक करतो. हा द्रष्टेपणाच आहे. भविष्याचा वेध घेण्याची ही क्षमता गजमुख गणेशात आहे. त्याचे कान सुपासारखे आहेत.तो बहुश्रुत आहे. काय ऐकावे आणि काय ऐकू नये, ऐकलेले काय लक्षात ठेवावे आणि काय विसरावे याचाही विवेक करावा लागतो. गणपती आपल्याला जणू तेही शिकवतो.

गणपतीची सोंड तीक्ष्ण आहे. आपल्या ज्ञानेंद्रियांची संवेदनशीलताही तीक्ष्ण असायला हवी.


तो तुंदिलतनु आहे तरीही त्याची चपळाई, लवचिकता वाखाणण्यासारखी आहे असेही गणेशाच्या रूपाचे विविध अर्थ घेता येतील.

डोक्यावर चंद्र असलेला गणेश आल्हादकता देतो.त्याने पोटावर सर्पाला बांधले आहे.त्याचे वाहन मूषक आहे. प्राणिजगताला आपलेसे करण्याचा हा गुण.

खरंतर जसे आपण तसा आपला देव असतो.. हो ना? त्यामुळे आपल्याला त्याच्या रूपातील जे भावेल ते स्वीकारावे.

सर्वांच्या कल्याणासाठी, अमंगलाचा नाश करण्यासाठी गणपती सदैव भक्तावर दृष्टी ठेवून आहे.मात्र भक्ताची भक्तीही डोळस हवी. उपास्य दैवतावर श्रद्धा ठेवताना तिच्याकडेही चिकीत्सक दृष्टीने पाहण्याची प्रेरणाही गणपती आपल्याला देतो आहे.

शुद्ध भक्ती, निर्मळ श्रद्धा आणि चिकीत्सक अभ्यास यासाठी मंगलमूर्ती आपल्याला आशीर्वाद देवो.


अफ़ग़ाणिस्तानातील गणेश
گنیش
संकल्पना आणि सुलेखन :
संकेत लिमये

# लेखांक १०

# ज्ञानांजली गणेशाचरणी !

गणेशोत्सवाचे वातावरण सर्वदूर भरून राहिले आहे.आपणही बाप्पाच्या चरणी लीन होऊन उत्सवी आनंद घेत आहोत.

खरंतर गणपती ही देवता आणि तिच्याबद्दल जाणून घेणे हा एक खचितच मोठा प्रवास आहे. आहे.मागील नऊ लेखांकांमधे त्यापैकी काही विषयांची थोडी झलक आपण पाहिली.

विविध अभ्यासकांनी गणपतीच्या रूपामागील, गुणवैशिष्ट्यांमागील विविध रूपके शोधण्याचा प्रयत्न आपल्या संशोधनाच्या, अभ्यासाच्या माध्यमातून केला आहे. असे असले तरी गणेश ही देवता आजही अनेकांच्या औत्सुक्याचा विषय बनलेली आहे. या शेवटच्या लेखांकात आपण गणपती या देवतेशी संबंधित वेगवेगळ्या ग्रंथांची, स्तोत्रांची माहिती घेऊ.

अथर्वशीर्ष आणि गणपतिस्तोत्र हे सामान्यतः महाराष्ट्रात घरोघरी म्हटले जाते त्यामुळे ते सर्वांच्या परिचयाचे असते.त्याव्यतिरिक्त सिद्धिविनायकस्तोत्र, विज्ञानगणराजस्तोत्र, गणेशहृदयस्तोत्र, शंकराचार्य विरचित गणेशपंचरत्नस्तोत्र, पंचश्लोकी गणेशपुराण अशी विविध स्तोत्रे गणपती देवतेच्या उपासनेसाठी रचली गेलेली आहेत.

अथर्ववेदाशी संबंधित गणेशपूर्वतापिनी उपनिषद आणि गणेशउत्तरतापिनी उपनिषद या दोन उपनिषदांमधे गणपतीविषयक तत्वज्ञान या उपनिषदांनी मांडलेले आहे.गणेशाशी संबंधित गणेशयंत्र, विनायकयंत्र अशा यंत्रांची माहिती यामधे दिलेली आहे.उत्तरतापिनी उपनिषदात गणपती म्हणजे ओंकार अशा आशयाची मांडणी केलेली आढळते.

हेरम्बोपनिषदात गणेशाशी एकात्म पावल्याने भक्ताचे कल्याण होते असे नोंदवत गणेशाची उपासना कशी करावी याचे मार्गदर्शन केले आहे.

गाणपत्य संप्रदायाचे अधिष्ठान मानले गेलेले श्रीगणेश पुराण,  मुद्गल पुराण हे ग्रंथ तर गाणपत्य उपासकांचे कंठमणीच आहेत.याखेरीज शिवाशी संबंधित लिंग पुराण, शिव पुराण यामधेही गणेशवर्णन आढळते.नारदपुराण, सौर पुराण, अग्नि पुराण अशा विविध पुराणग्रंथांमधे गणेशाचे महात्म्य, उपासना, विधिविधान यांचे वर्णन केलेले दिसून येते.गणेशगीता ही गणेशाच्या उपासनेशी संबंधित रचनाही उपलब्ध आहे.गणेश पुराणाच्या क्रीडाखंडामधे गणेशगीतेचा समावेश आहे.वरेण्य नावाच्या राजाला प्रत्यक्ष गणपतीने केलेला उपदेश गणेशगीतेमधे समाविष्ट आहे.गणेशचतुर्थीच्या दिवशी गणेशगीतेचा पाठही करावा असा संकेत रूढ आहे.

गाणपत्य उपासकांपैकी मोरगाव येथील अंकुशधारी योगींद्र महाराज रचित योगींद्रविजय नावाचा ग्रंथ हा गणेश अद्वैत सिद्धान्ताचा बोध करून देणारा ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे.

लेखांकाच्या शेवटी एक संकल्प जरूर सुचवावासा वाटतो.ज्ञानाची उपासना करणाऱ्या, वाणीचा अधिपती असलेल्या गणेशाचे चिंतन आपण दहा दिवस केले.पण हा शेवट नसून ही सुरुवात आहे.गणेशाच्या रूपामागील तत्वज्ञान, त्याचा देवता म्हणून विकास, त्याच्या रूपकांमागील आशय, त्याची गुणवैशिष्ट्ये असे विविध विषय आपल्यासमोर आले आहेत.यानिमित्ताने गणेशाशी संबंधित विविध ग्रंथ शोधावेत व त्यांचा अभ्यास करावा. आपल्याला माहिती नसलेल्या एखाद्या नव्या स्तोत्राचा शोध घ्यावा व ते शिकावे आणि इतरांनाही शिकवावे हा सुद्धा या गणेशव्रताचा एक भाग नक्कीच होऊ शकतो.

बुद्धीदाता गणेश यासाठी आपल्या मनात अभ्यासाची प्रेरणा सतत जागी ठेवो!

गणपतीबाप्पा मोरया!!!

***********************


संकल्पना आणि सुलेखन :
संकेत लिमये
पुढच्या वर्षी लवकर या
विसर्जन